# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

रौप्य महोत्सवी वर्ष
१९७९-२००४

४ था मजला, एक्सप्रेस टॉवर्स, नरीमन पॉईंट, मुंबई-४०० ०२१
दुरध्वनी क्र. : २२०२६२४९, २२८३५२४७ फॅक्स : २२०२९२४८
ई.मेल पत्ता: mstmjp@rediffmail.com
caomjp@rediffmail.com
वेब पत्ता : mahajeevan.com


जा. क्र. मजीप्रा/सस/तांशा-१/ ३४६ दिनांक : ११ मार्च, २००५

## परिपत्रक क्र. १०२

**विषय :** मंत्रालयातील बैठकीसाठी येणाऱ्या अधिकाऱ्यांच्या उपस्थितीबाबत..

मंत्रालयात पाणी पुरवठा व मलनि:सारण योजनांच्या विविध कामासंदर्भात मा. मंत्री महोदय तसेच प्रधान सचिव तसेच मजीप्राच्या संचालक मंडळाची / निविदा समितीच्या बैठका आयोजीत करण्यात येत असतात. सदरहू बैठकांसाठी आवश्यक त्या कागदपत्रांसह संबंधित अधिकाऱ्यांनी हजर राहून संबंधित योजनांची / विषयाबाबत माहिती देणे आवश्यक असते.

तथापि, असे निदर्शनास आले आहे की, बैठकीशी संबंधित अधिकारी यांची उपस्थिती आवश्यक असताना, संबंधित अधिकाऱ्याबरोबर इतर अनेक कनिष्ठ अधिकारी या बैठकीकरिता हजर असतात. उदा. मुख्य अभियंता यांना बैठकीकरिता आमंत्रित केले असता त्यांचे बरोबर संबंधित अधीक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता, उप-अभियंता व कनिष्ठ अभियंता असे एकुण ४ ते ५ अधिकारी हजर असतात. वास्तविक पाहता संबंधित अधिकारी यांनी त्यांचे कार्यालयात सर्व संबंधित अधिकाऱ्यांकडून संपूर्ण माहिती व कागदपत्रे घेऊन बैठकीस उपस्थित राहाणे आवश्यक आहे व याबाबत यापूर्वीही परिपत्रकाव्दारे सूचित करण्यात आलेले आहे. तथापि, त्याची योग्य ती दखल घेतलेली दिसून येत नाही, याची गंभीर दखल घेण्यात येत आहे. तरी यापुढे मंत्रालयात होणाऱ्या बैठकांसाठी ज्या अधिकाऱ्यांना बोलविण्यात आलेले असते त्यांनीच ज्या विषयाकरिता बैठक आयोजीत केलेली आहे त्या विषयाची पूर्ण माहिती घेऊन योग्य त्या कागदपत्रांसह हजर रहावे. एखाद्या अपवादात्मक परिस्थितीत एखाद्या कनिष्ठ अधिकाऱ्यास संबंधित योजनेविषयी संपूर्ण माहिती असेल व त्या अधिकाऱ्याची गरज असेल तरच त्या अधिकाऱ्यास परवानगी घेऊन बैठकीकरिता सोबत आणावे.

जर बैठकीकरिता संबंधित अधिकाऱ्यापेक्षा इतर अनावश्यक अधिकारी उपस्थित असतील तर इतर अधिकाऱ्यांच्या प्रवासभत्त्यापोटी मजीप्रास करावा लागणारा सर्व खर्च संबंधित अधिकाऱ्याकडून वसूल करण्यात येईल, याची काटेकोरपणे नोंद घेण्यात यावी.

(दीपक भसाळे)
सदस्य सचिव

प्रत : मुख्य अभियंता, मजीप्रा, ठाणे, पुणे, नाशिक, अमरावती, औरंगाबाद, नागपूर.
प्रत : वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी, मजीप्रा, नवी मुंबई.
प्रत : सर्व अधीक्षक अभियंता, मजीप्रा मंडळ,